माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५मधील कलम १८(१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक: ९०/२०२३**

| तक्रारकर्ता | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपीलीय अधिकारी** |
| श्री. राहुल गोविंद गुढे, व्दारा सतीश रामटेके, घर क्र. १२७४-बी, पो. युनिवसीर्टी कॅम्पस, अंबाझरी पंचशील लायब्ररी जवळ, नागपूर ४४००३३ | शासकीय न्यायसहायक विज्ञान संस्था, रविंद्रनाथ टागोर मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर ४४०००१ | शासकीय न्यायसहायक विज्ञान संस्था, रविंद्रनाथ टागोर मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर ४४०००१ |

## सुनावणी दिनांक ११.०६.२०२५

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) नुसार दि. २०.०३.२०२३ (प्राप्त दिनांक २१.०३.२०२३) रोजी आयोगाकडे थेट तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रारीवर आज दिनांक ११.०६.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता यांच्यावतीने अॅड एम. वानखेडे उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा शासकीय न्यायसहायक, विज्ञान संस्था, नागपूर श्री. निलेश वि. धांदे उपस्थित आहेत. तत्कालीन जनमाहिती अधिकारी श्रीम. शिवकन्या सुभाष कदम उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा संचालक, शासकीय न्यायसहायक, विज्ञानसंस्था, नागपूर डॉ. संजय ठाकरे उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार द्वितीय अपील दाखल न करता " i. Kindly take action against the Non-Applicant No. 2 for not following the directives of Section 7 (1) and 7 (6) of The Right to Inforamtion Act 2005.
ii. Kindly direct the Non-Applicants to return the amount of 1940 with interest to the Applicant.
iii. The Applicant demands the compensation of 10,00,000 from the Non-applicants for deliberately causing mental agony to the Applicant.
iv. Kindly direct the Non-Applicants to give the requested information related with Dr. Ramdas Gomaji Atram. " असे कारण नमुद करुन कलम १८(१) नुसार थेट तक्रार दाखल केली आहे.

तक्रारकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा शासकीय न्यायसहायक विज्ञान संस्था, नागपूर यांच्याकडे दि. १७.१२.२०२२ रोजी माहिती अर्ज सादर करून खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"a) True copied of attendance register of all lectures and practicals conducted by Government Institute of Forensic Science, Nagpur.

b) True copies of letters, documents and applications that reflects the leaves granted to the students for any purpose including leaves for sickness, sports,camps of NCC,camps of NSS and for any other purpose."

सदर माहिती अर्जास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी शासकीय न्यायसहायक विज्ञान संस्था, नागपूर यांनी तक्रारकर्ता यांना दि. १६.०१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे प्रतिसाद दिल्याचे दिसून येते.

"माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (१) अन्वये करण्यात आलेल्या अर्जातील माहितीचा दस्ताऐवज हा एकूण ९७० प्रती होत असून आपण सदरील दसताएवेजासाठी लागणाऱ्या प्रतीसाठीचा खर्च प्रति प्रत रुपये २ या दराने एकूण १९४०/- रुपये हे आपणास सोयीस्कर पध्दतीने (BY CASH/BANKERS CHEQUE/DEMAND DRAFT/INDIAN POSTAL ORDER) आपण व्यक्तिश: येवुन किंवा आपल्या अधिकृत प्रतिनिधीव्दारे जमा करावेत जेणेकरून आपणास विनाविलंब माहिती उपलब्ध करून देणे सोयीचे होईल, . असा प्रतिसाद दिला आहे.

त्यानंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक, शासकीय न्यायसहायक विज्ञान संस्था, नागपूर यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (१) अन्वये, दि.२४.०१.२०२३ रोजी प्रथम अपिल अर्ज (जोडपत्र-ब) सादर केला आहे. त्यानुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक, शासकीय न्यायसहायक विज्ञान संस्था, नागपूर यांनी प्रथम अपिल अर्जावर दिनांक १४ फेब्रुवारी २०२३ रोजी ठीक ४.०० वा सुनावणी आयोजित करून दि. २३.०२.२०२३ रोजी आदेश पारित केले आहे.

**युक्तीवाद/खुलासा** :- आज सुनावणी दरम्यान उपस्थित जनमाहिती अधिकारी तथा शासकीय न्यायसहायक विज्ञान संस्था, नागपूर यांनी दि. ११.०६.२०२५ रोजी आयोगास सादर केलेल्या दस्ताऐवजानुसार , "श्री. रामदास गोमाजी आत्राम यांनी घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचा दस्ताऐवज" देण्यात आला नाही या संदर्भात तत्कालीन जनमाहिती अधिकारी श्रीम. शिकन्या कदम यांनी दिलेल्या स्पष्टीकरणानुसार सदरील माहिती अपिलकार्ता यांच्या आवक क्र. ५९९/२०२२ दि. १६.११.२०२२ च्या अर्जानुसार दि. १४.१२.२०२२ रोजी जावक क्र. ४७०/२०२२ अन्वये या आगोदरच अपिलकर्ता/अर्जदार यांना प्राप्त आहे व सदरील माहिती "Repetitive" असल्याने सदरील माहिती वगळता उपलब्ध सर्व माहिती अपिलकर्ता यांना देण्यात आलेली आहे. याबाबतचा पुरावा दस्ताऐवज तसेच केंद्रीय सतर्कता आयोग यांचे दिनांक ०४.०२.२०२२ चे परिपत्रक CVC/RTI/MISC/१६/००६ तसेच मा. केंद्रीय माहिती आयोग यांच्या अपिल क्र. CIC/CCITB/A/२०१७/१७९४३७-BJ मधील आदेशाची प्रत मा. राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या सेवेत सविनय सादर करण्यात येत आहे, असे कळविले.

**निष्कर्ष** :सदर तक्रारीसंदर्भांत सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

१. शासकीय न्यायसहायक विज्ञानसंस्था, नागपूर यांनी वेळेत माहिती उपलब्ध करून दिली नाही असे कारण नमूद करत, तसेच १० लाख रुपयांची नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी करीत राज्य माहिती आयोगाच्या नागपूर खंडपीठाकडे तक्रार केली होती.
२. आज बुधवार, दि. ११ जून २०२५ रोजी आयोगात झालेल्या सुनावणीच्या वेळी तक्रारदार श्री. राहुल गोविंद गुढे यांच्या तर्फे त्यांचे विधिज्ञ आणि प्राधिकरणातर्फे जनमाहिती व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.
३. तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा सहायक प्राध्यापक (कायदा), शासकीय न्यायसहायक विज्ञान संस्था, नागपूर यांनी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीच्या नोंदीची सत्यप्रत (११२४ पाने) व रजा किंवा इतर दस्तऐवजाच्या नोंदीची सत्यप्रत (२ पाने )इत्यादी माहिती तक्रारकर्ता यांना दि. २३.०१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रदान केली आहे. तक्रारकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे व्यापक स्वरुप लक्षात घेता, माहिती देण्यास प्राधिकरणाकडून झालेला केवळ दोन दिवसांचा विलंब क्षमापित करण्यात येत आहे.
४. तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही संयुक्तिक आढळून येते, त्यामुळे सदर तक्रार अर्ज निकाली काढणे क्रमप्राप्त ठरते.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

Gnimdeo

**(गजानन निमदेव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण :** **नागपूर**
**दिनांक :** **११.०६.२०२५**

जा.क्र. 3197 दि. 24 JUN 2025

SD E:\11.06.2025तक्रार क्र90-2023- गूढे